**BDC LIBRARY**

**News Paper Clipping**

**A.Y. 2025-26**

दैनिक

एकमेव विचारपत्र

महाराष्ट्र न्यूज

March 3, 2026

Page no:4 | epaper.mahanewsnet.com वार मंगळवार

# पाटण महोत्सव पाहण्यासाठी गर्दी

## ग्रामीण भागातील अर्थचक्राला गती



* महाराष्ट्र न्यूज नेटवर्क

पाटण, दि. २ मार्च : शेतकरी, व्यापारी आणि नवउद्योजाकांना एक व्यासपीठ मिळावे त्यांना रोजगाराच्या संधी बाबत मार्गदर्शन मिळावे. तसेच बाजारपेठ उपलब्ध व्हावी या हेतूने आयोजित कोयना एज्युकेशनच्या पाटण महोत्सवास लोकांच्या कडून भरपूर प्रतिसाद मिळाला आहे. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, पारंपरिक कला सादरीकरणे आणि स्थानिक कलाकारांच्या उत्कृष्ट सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली. कृषी कंपन्यांचा सहभाग, विविध प्राणी आणि पक्षी, कृषी अवजारे, बियाणे, खते आणि आयुर्वेदिक औषधे तसेच इलेक्ट्रिक गाड्या यांचा समावेश आहे. एकंदरीत पाटण महोत्सव हा पाटणवासीयांसाठी पर्वणीच म्हणावा लागेल. यामुळे बरीच आर्थिक उलाढाल सुद्धा पाहायला मिळाली आहे.

पाटण महोत्सव २०२६ मध्ये विविध कार्यक्रम सुद्धा आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये सोनम लोहार यांचा सदाबहार गीतांचा कार्यक्रम तसेच महिलांसाठी खेळ पैठणीचा, आई माझ्या महाविद्यालयात विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी लागीर झालं जी फेम प्रसिद्ध अभिनेत्री कल्याणी नंदकिशोर यांची उपस्थिती होती. आकाशवाणी वरील विजय गायकवाड व साथीदार यांचा स्वरसह्याद्री म्युझीक ग्रुप पाटण एक संगीतमय मैफिल व सायंकाळी संगीत लोकधारा प्रस्तुत द फोक जगदंब आख्यानाने उपस्थितांची मने जिंकली. दिवसभराच्या कार्यक्रमाचा मनमुरादपणे प्रेक्षकांनी आनंद घेतला.

महोत्सवात महिलांसाठी, युवकांसाठी तसेच लहान मुलांसाठी विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सवरही नागरिकांची मोठी रांग लागलेली दिसून आली. या महोत्सवामुळे शहरातील सांस्कृतिक वातावरण अधिक समृद्ध झाले असून नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पाटण महोत्सवामध्ये सगळ्यांनी आस्वाद तर घेतलाच पण त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराची संधी तसेच अर्थचक्रास गती मिळाली. महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी सकाळी ग्रुप डान्स, सादरीकरण व स्पर्धा, दु. २ वा. शेतकऱ्यांसाठी कृषीपर व्याख्यान, सायं. ४ वा. लकी ड्रॉ सोडत व बक्षीस वितरण समारंभ होणार आहे. यावेळी सिनेअभिनेते समृद्धी जाधव यांची उपस्थिती असणार आहे, या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन महोत्सव समितीकडून करण्यात आले आहे.